Pune Police

प्रेस नोट

**डॉक्टर असल्याचे भासवुन वाहन चोरी करणा-यास फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाकडुन शिताफीने पकडुन अटक**

फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.महेंद्र पाटील व तपास पथकातील कर्मचारी हे फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दीत वाहन चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध घालण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असतांना पोलीस कर्मचारी शंकर कुंभार यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, इसम नामे शहारुख रज्जाक पठाण वय २२ रा.सर्व्हे नं.२५७ बुधाची वाडी बनपुरी ता. पुरंदर जि.पुणे शहर व परिसरातुन दुचाकी वाहने चो-या करीत आहेत.

प्राप्त बातमीवरुन मा.वरिष्ठांचे आदेशावरुन वर नमुद इसमास सापळा रचुन शिताफीन पकडुन त्याचेकडे तपास करता तो लोकांना संशय येवु नये म्हणुन डॉक्टरचा ॲप्रन घालुन त्यावर नेम प्लेट लावत होता. तसेच बॅगेत डॉक्टरांना आवश्यक असणारे साहित्य बाळगत होता. जेणेकरुन त्यास पोलीसांनी किंवा नागरीकांना हटकताच डॉक्टर आहे चोर नाही असे सांगुन निसटता येईल किंवा चालाखिने चोरीचे वाहन घेवुन जात असे. सदरचा इसम हा वाहन चोरी करताना चारचाकी वाहनातुन जावुन चोरलेली वाहने विक्री करीत असे. त्याने पुणे शहर व परिसरातुन एकुण **३० वाहने** चोरल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची वाहने जप्त करुन त्याबाबत तपास करता खालील पोलीस स्टेशनकडे दाखल असलेले गुन्हे उघडकीस आले आहेत.

**अ.क्र. १) फ.खाना पो.स्टे.गुरनं. ८०/२०१९ भादवी क.३७९ २) फ.खाना पो.स्टे.गुरनं. ८१/२०१९ भादवीक.३७९**
**३) फ.खाना पो.स्टे. गुरनं.८६/२०१९ भादवीक.३७९ ४) फ.खाना पो.स्टे.गुरनं.८८/२०१९ भादवी क.३७९**
**५) फ.खाना पो.स्टे.गुरनं.८९/२०१९ भादवी क.३७९ ६) फ.खाना पो.स्टे.गुरनं. ४५/२०१९ भादवी क.३७९**
**७) फ.खाना पो.स्टे.गुरनं.३७०/२०१८भादवी क.३७९ ८) फ.खाना पो.स्टे.गुरनं.९०/२०१९ भादवी क.३७९**
**९) बंडगार्डन पो.स्टे.गुरनं.३५१/१८ भादवीक.३७९ १०) बंडगार्डन पो.स्टे.गुरनं. ६८/२०१९ भादवीक.३७९**
**११) वानवडी पो. स्टे. गुरनं.३४९/१८ भादवीक.३७९ १२) पिंपरी.स्टे.गुरनं. ३२३/१९ भादवीक.३७९**
**१३) डेक्कन पो.स्टे.गुरनं. ८१/२०१९ भादवी क.३७९ १४) चिंचवड पो.स्टे.गुरनं. २०/२०१९ भादवीक.३७९**
**१५) चिंचवड पो.स्टे.गुरनं.६८/२०१९ भादवीक.३७९ १६) चिंचवड पो.स्टे.गुरनं. १४/२०१९ भादवीक.३७९**
**१७)हडपसर पो.स्टे.गुरनं.९६२/२०१८ भादवीक.३७९, १८) दिघी पो.स्टे.गुरनं. १०८/२०१७ भादवीक. ३७९,**
**१९) वाकड पो.स्टे.गुरनं. २८०/१८ भादवीक. ३७९, २०) लष्कर पो.स्टे.गुरनं. १०५/१८ भादवीक. ३७९**
**२१) कोथरुड.पो.स्टे.गुरनं.१३३/२०१८ भादवीक.३७९ २२) चतु:शृंगी.पो.स्टे.गुरनं.१९८/२०१८ भादवी क.३७९**
**२३) चतु:शृंगी.पो.स्टे.गुरनं.४०८/२०१८ भादवी क.३७९**
**२४) महात्मा फुले पो.स्टे.कल्याण ठाणे गुरनं. ८१/२०१९ भादवी क.३७९**
**२५) दौंड पोलीस स्टेशन गुरनं. २५९/२०१८ भा.द.वि. कलम ३७९**

*एकुण ३० वाहने हस्तगत*

**त्यामध्ये २६ दुचाकी, ३ चारचाकी व १ टेम्पो असा एकुण २७,२५,०००/- चे किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे** एकुण ३० वाहने जप्त करुन एकुण २४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. तसेच नमुद आरोपींनी ज्यांना वाहने दिली होती अशा व्यक्तिंना नोटीसा देण्यात आल्या आहेत. तसेच इतर वाहनांबाबत तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.रविंद्र सेनगांवकर, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्री.सुहास बावचे,सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री.प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.किशोर नावंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे,श्री.संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) फरासखाना पोलीस स्टेशन पुणे तसेच उपनिरीक्षक महेंद्र पाटील, पोहवा बापुसाहेब खुटवड, केदार आढाव, पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे,अमोल सरडे,विकास बो-हाडे,शंकर कुंभार,सयाजी चव्हाण,विशाल चौगुले, हर्षल शिंदे, महाविर वलटे,मोहन दळवी,आकाश वाल्मीकी,अमेय रसाळ,यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे


पुणे शहर पोलीस आयुक्तालय


पुणे शहर पोलीस आयुक्ताल